सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
RNI No. - MAHMAR 2023/84526
https://epaper.vidarbhaprajasattak.com
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२४८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.३० ऑक्टोबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## अयोध्येत ५५ घाटांवर २८ लाख दिवे लागणार
## ऐतिहासिक दीपोत्सवाचा मोठा उत्साह

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अयोध्या**

श्री रामलल्लाच्या अयोध्येत बुधवारी आठवा दीपोत्सव साजरा होत आहे. हा दीपोत्सव यंदा अगदी खास असेल; कारण, येथील भव्य मंदिरात यंदा प्रत्यक्ष रामलल्ला विराजमान आहेत. यंदा ५५ घटांवर तब्बल २८ लाखांहून अधिक दिवे प्रज्वलित केले जाणार असून, हा एक जागतिक विक्रम ठरेल. या पार्श्वभूमीवर चोख बंदोबस्त असून, १० हजार पोलिस तैनात केले आहेत. दीपोत्सवात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची उपस्थिती



असेल.

हेलिपॅडजवळ उभ्या व्यासपीठावर श्री राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, श्री हनुमान व वशिष्ठ मुनींच्या वेशभूषेतील कलाकारांवर पुष्पवृष्टी केली जाईल. यानंतर रामकथा पार्कमधील व्यासपीठावर ते आसनस्थ होतील. श्री राम-सीता पूजन झाल्यानंतर तेथे प्रतीकात्मक राज्याभिषेक होईल. सायंकाळी शरयू तीरावर आरती होणार असून 'राम की पैडी'वर शुभमुहूर्तावर दीप प्रज्वलित केले जातील.

### ५०० वर्षांची प्रतीक्षा संपली : मोदी

प्रभू श्रीराम तेव्हा १४ वर्षांचा वनवास संपवून अयोध्येत परतले होते. मात्र, आज सुमारे ५०० वर्षांच्या प्रतीक्षेनंतर रामलल्लाच्या जन्मगावी उभारण्यात आलेल्या भव्य मंदिरात हजारो दिवे तेवणार आहेत. म्हणून यंदाची ही दिवाळी ऐतिहासिक आहे.

**लेझर शो अन् आतषबाजी**

या दीपोत्सवानिमित्त लेझर शोचे आयोजन करण्यात आले असून शरयू तीरावर आकर्षक आतषबाजी केली जाणार आहे. यात पर्यावरणपूरक आतषबाजीसह डिजिटल आतषबाजीही पाहावयास मिळेल.

यंदा प्रथमच नव्या मंदिरात विराजमान प्रभू श्रीराम दीपोत्सवात सहभागी होणार असल्याने अयोध्येत प्रचंड उत्साह आहे. प्रभू श्रीराम श्रीलंकेमध्ये विजय मिळवून त्रेतायुगात अयोध्येत परतले होते. त्या काळातील आनंदी वातावरण यंदा येथे पाहावयास मिळेल.

## राज्यातून ७९१५ उमेदवारांचे १०९०५ नामनिर्देशन पत्र दाखल; आज छाननी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० मुंबई**

विधानसभा निवडणुकांच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. राज्यात आज अर्ज दाखल करण्यासाठी अंतिम दिवस होता. यामुळे राज्यभरात अर्ज दाखल करण्यासाठी नेत्यांची मोठी गर्दी होती. राज्यात २८८ जागांसाठी निवडणुकीकरिता आज




२९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत ७ हजार ९९५ उमेदवारांचे १० हजार ९०५ नामनिर्देशन पत्र दाखल झाली आहेत अशी माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता १५ ऑक्टोबर २०२४ पासून लागू झाली असून २२ ऑक्टोबर २०२४ रोजी निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. आज नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची शेवटची तारीख होती. आजपर्यंत आलेल्या अर्जांची ३० ऑक्टोबरला छाननी करण्यात येऊन ४ नोव्हेंबर २०२४ रोजी अर्ज मागे घेता येईल. मतदान २० नोव्हेंबरला होत असून २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे.

गेल्या काही दिवसापासून राज्यात महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये जागावाटपाबाबत बैठकांचे सत्र सुरुच होते. दरम्यान, आता आज अखेर अर्ज दाखल करण्याची शेवटची मुदत संपली आहे, आता ३० ऑक्टोबरला छाननी करण्यात येणार आहे. यानंतर ४ नोव्हेंबर दिवशी अर्ज माघार घेता येणार आहे. यानंतर राज्यातील लढती ठरणार आहेत.

## भाजप बंडखोर उमेदवार म्हणतात, आमची ' निष्ठावंत भारतीय जनता पार्टी'

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

बडनेरा मतदारसंघातील वातावरण सुरूवातीपासूनच तापलेले. युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा हे भाजप समर्थक आमदार. त्यामुळे येथे महायुतीला कुणाला पाठिंबा देणार, याची प्रतीक्षा होती. अपेक्षेप्रमाणे भाजपने रवी राणांना समर्थन जाहीर केले. दुसरीकडे, भाजपचे इच्छुक उमेदवार तुषार भारतीय हे पूर्ण तयारीनिशी मैदानात उतरलेले. यावेळी माघार अशक्यच असा नारा त्यांनी दिलेला. राणांना महायुतीने पाठिंबा दिल्यास बंडखोरी अटळ मानली गेली. तुषार भारतीय यांनी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला. त्यावेळी भाजपच्या एका गटाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते.

तुषार भारतीय यांनी गेल्या दोन ते अडीच वर्षांपासून बडनेरा मतदारसंघात प्रचार सुरू केला आहे. त्यांची मनधरणी करण्याचे प्रयत्न भाजपच्या नेत्यांनी केले, पण ते अडून बसले. भाजपची उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी बंडखोरी करण्याचा निर्णय घेतला. आता त्यांची प्रचाराची पद्धत चर्चेत आली आहे.

तुषार भारतीय यांनी प्रचार पत्रकावर 'निष्ठावंत भारतीय जनता पार्टी', असा केलेला उल्लेख लक्षवेधी ठरला आहे. हीच ती वेळ संघटन मजबूत करण्याची. आपला माणूस निवडून आणण्याची, असा नारा या पत्रकावर आहे. हे पत्रक सर्वत्र झळकले आहे.विशेष म्हणजे या पत्रकावर अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, बाळासाहेब ठाकरे, पंडित दीनदयाल उपाध्याय, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, मुरली मनोहर जोशी, सुषमा स्वराज, प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, पांडुरंग फुंडकर




यांची छायाचित्रे आहेत.

बडनेरा मतदारसंघातून गेल्या निवडणुकीत रवी राणा हे काँग्रेस, राष्ट्रवादीच्या पाठिंब्यावर उभे होते. पण, निवडून आल्यानंतर त्यांनी भाजपला पाठिंबा दिला होता. गेल्या चार दशकांपासून पक्षाचे कामे करणाऱ्या कार्यकर्त्यांना उमेदवारी मिळत नाही आणि उपऱ्यांना सन्मानाचे स्थान मिळते, अशी खंत तुषार भारतीय यांनी व्यक्त करीत बंडाचा झेंडा उंचावला आहे.

रवी राणा हे देवेंद्र फडणवीस यांचे निकटचे मानले जातात. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी रवी राणा हे भाजपमध्ये येतील, असे वक्तव्य केले होते, पण राणांनी लगेच त्याला नकार देत आपण युवा स्वाभिमान पक्षातच राहू, असे जाहीर केले होते. बडनेरामधून शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे सुनील खराटे यांच्या विरोधात प्रीती बंड यांनी केलेली बंडखोरी देखील गाजत आहे. महायुती आणि महाविकास आघाडीला या ठिकाणी बंडखोरीचा सामना करावा लागत आहे.

## पीएम मोदींच्या ८, गडकरीच्या ४० तर योगींच्या १५ सभा
## भाजपच्या झंझावाती प्रचाराला सुरवात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० मुंबई**

महाराष्ट्रात पुढील महिन्यात विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. काल(२९ ऑक्टोबर २०२४) उमेदवारी दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. आता राज्यात प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. राज्यातील सत्ताधारी भाजपने आपली निवडणुकीची तयारी पूर्ण केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींपासून ते गृहमंत्री अमित शाह, नितीन गडकरी अन् इतर बडे नेते महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जाहीर सभा घेणार



आहेत.

पंतप्रधान मोदी पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मुंबई-कोकण, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात एकूण आठ सभा घेणार आहेत. तर, देवेंद्र फडणवीस, नितीन गडकरी आणि चंद्रशेखर बावनकुळे राज्यात जास्तीत जास्त जाहीर सभा घेणार आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथदेखील महाराष्ट्रात एकूण १५ जाहीर सभा घेणार आहेत.

**महाराष्ट्रात कोणाच्या किती सभा होणार?**

पंतप्रधान नरेंद्र मोदी - ८
अमित शहा - २०
नितीन गडकरी - ४०
देवेंद्र गडकरी - ५०
चंद्रशेखर बावनकुळे - ४०
योगी आदित्यनाथ - १५

**प्रामुख्याने दोन आघाड्या मैदानात समोरासमोर**

महाराष्ट्रात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेस, उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस यांनी मिळून महाविकास आघाडी स्थापन केली. यावेळी महाराष्ट्र निवडणुकीत दोन आघाड्यांमध्ये प्रमुख लढत पाहायला मिळणार आहे. सत्ताधारी महायुती आणि महाविकास आघाडी आमनेसामने आहेत. महायुतीत भाजप, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसच आहे.

## 'मविआ' च्या शिलेदारांसाठी राहुल गांधी मैदानात, ६ नोव्हेंबरला फोडणार प्रचाराचा नारळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० मुंबई**

राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत आहेत. महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये यावेळी मुख्य लढत पाहायला मिळत आहे. त्यामुळे या निवडणुकीमध्ये महायुती सत्ता राखणार की महाविकास आघाडी बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. सध्या मतदारांना आकर्षित करण्यासाठी महाविकास आघाडी आणि महायुतीकडून जोरदार प्रचाराची सुरुवात देखील झाली आहे.

तर आता एक मोठी बातमी समोर आली आहे. या बातमी लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी देखील महाविकास आघाडीच्या प्रचारसाठी महाराष्ट्रात येणार आहे. राहुल गांधी ६ नोव्हेंबरला मुंबईत सभा घेणार असल्याची माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे. ते आज माध्यमांशी बोलत होते.



माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, महाविकास आघाडीकडून काँग्रेसची पहिली प्रचार सभा ६ नोव्हेंबर रोजी मुंबईतील बीकेसी मैदांनावर पार पडणार आहे आणि या सभेसाठी राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे , उद्धव ठाकरे उपस्थित राहणार आहे. तसेच या सभेत राहुल गांधी काँग्रेसकडून महाराष्ट्रासाठी पाच गॅरंटी जाहीर करणार आहे. असं देखील काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले.

पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले की, ६ नोव्हेंबरला राहुल गांधी आणि राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे महाराष्ट्र दौऱ्यावर असणार आहे. दोन्ही नेते नागपूर येथील पक्षाच्या कार्यक्रमानंतर काँग्रेससाठी मुंबईत प्रचाराचा नारळ फोडणार आहेत आणि यावेळी महाविकास आघाडीचे सर्व वरिष्ठ नेते उपस्थित राहणार आहे. अशी माहिती देखील त्यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसकडून १०४ उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे तर महाविकास आघाडीमधील घटक पक्ष शिवसेनेकडून ८० पेक्षा जास्त उमेदवारांची घोषणा केली आहे तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून देखील ५० पेक्षा जास्त उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे.

सध्या महाविकास आघाडी आणि महायुतीकडून काही मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढत होण्याची शक्यता आहे मात्र कोणता पक्ष किती जागांवर निवडणूक लढवणार आहे याबाबत अधिकृत माहिती ४ नोव्हेंबरपर्यंत समोर येणार आहे.

## बंडखोरी रोखण्यासाठी अनेक दिग्गज नेते मैदानात, बैठकांचे सत्र सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरु झाली आहे. यंदा विधानसभा निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकासआघाडी अशी लढत पाहायला मिळणार आहे. राज्यातील २८८ मतदारसंघांसाठी एकूण ७ हजार ९९५ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. महायुती आणि महाविकासआघाडीत अनेक ठिकाणी बंडखोरी पाहायला मिळत आहे. महायुती आणि महाविकास आघाडीत जाहीर करण्यात आलेल्या उमेदवार याद्यांनंतर काही मतदारसंघांमध्ये पक्षांतर्गत नाराजी समोर आली आहे. त्यामुळे काहींनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे. त्यामुळे



महायुती आणि महाविकासआघाडीतील नेत्यांची दिवाळी बंडखोरांचं बंड रोखण्यातच जाणार असल्याचे बोललं जात आहे.

महायुती आणि महाविकासआघाडीमध्ये काल बऱ्याच बंडखोरांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. काहींना तर पक्षातूनच उमेदवारी मिळाल्याने त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे आता हे बंड कसं शमवायचं, याचे राज्यातील सर्वच मोठ्या नेत्यांना टेन्शन आले आहे. महायुती आणि महाविकासआघाडीतील नेत्यांची दिवाळी बंडखोरांचं बंड रोखण्यातच जाणार असल्याचे बोललं जात आहे. ऐन दिवाळीत राजकीय फटाके वाजू नयेत यासाठी नेत्यांचा कस लागणार आहे.

## मी निशाणी लोकांमधून कमावलीय, ढापली नाही; सत्तासंघर्षावरुन राज ठाकरेंचा टोला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० मुंबई**

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला होता. महायुतीसोबत जागा वाटपाचा प्रश्न पुढे न गेल्याने राज ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीत पाठिंबा देण्याचे ठरवलं होतं. राज ठाकरे यांनी महायुतीच्या उमेदवारांसाठी सभा देखील घेतल्या होत्या. मात्र राज ठाकरे यांनी आता लोकसभा निवडणुकीत मागितलेल्या जागांबाबत भाष्य केलं आहे. लोकसभा निवडणुकीत दक्षिण मुंबईतून उमेदवारी न मिळाल्याबाबत राज ठाकरेंनी प्रतिक्रिया दिली आहे.

एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीमध्ये राज ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीबद्दल बोलताना महाराष्ट्रात सुरु असलेल्या राजकारणावरही भाष्य केलं. पक्षाचे नाव व



चिन्ह घेणं योग्य नसल्याचे म्हणत राज ठाकरेंनी अप्रत्यक्षपणे एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना टोला लगावला आहे. तसेच लोकसभा निवडणुकीत दक्षिण मुंबईची जागा दिली असती तर ती १०० टक्के निवडून आली असती असेही राज ठाकरे म्हणाले. मात्र त्यावेळी शिवसेनेकडून मनसेच्या उमेदवाराला धनुष्यबाण चिन्हावरुन लढण्याची ऑफर देण्यात आली होती. त्याबाबतही राज ठाकरेंनी प्रतिक्रिया दिली.

प्रत्येक पक्षाचा आपापल्या पद्धतीने ओरबाडण्याचा प्रयत्न सुरू आहे. आपण लोकांना किती आणि काय काय सांगायला जायचं. याचा अनुभव लोकसभेच्या निवडणुकीत आलाच. लोकसभा निवडणुकीत दक्षिण मुंबई आणि दक्षिण मध्य मुंबईची जागा तुमच्या हाती लागणार नाही हे मी त्यांना सांगितलं होतं. हे सांगून हट्टा पायी जागा पाडायच्या असतील तर पाडून घ्या. ती जर जागा आम्ही लढलो असतो १०० टक्के चित्र वेगळं असतं. त्यानंतर ते सांगतात की तुम्ही आमच्या निशाणीवर निवडणूक लढवली पाहिजे. कसं आहे मी लोकांमधून कमावलेली निशाणी आहे ढापलेली नाही. इतक्या वर्षांच्या निवडणुकीच्या प्रवासात मिळालेली निशाणी आहे. ती निशानी लोकांच्या मतदानातून मिळालेली आहे कोर्टातून आलेली नाही, असं राज ठाकरे यांनी म्हटलं.

संपादकीय ......

# जनगणना होणार!

देशाला प्रगतिपथावर न्यायचे असेल, तर देशात किती लोक राहत आहेत, त्यांचा वयोगट, नोकरी-व्यवसाय, उत्पन्न आदींची माहिती सरकारकडे असणे आवश्यक असते. तपशिलासह अचूक माहिती व आकडेवारी असल्यासच धोरणे प्रभावी ठरू शकतात. म्हणूनच भारतातील बहुचर्चित जनगणना २०२५ मध्ये घेऊन, ती २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचा केंद्र सरकारचा विचार स्तुत्य आहे. जनगणना पूर्ण झाल्यानंतर लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना होईल. २०२९ च्या निवडणुकीपूर्वी हे काम पूर्ण होणे अपेक्षित असून, त्यानंतर महिलांसाठी राखीव जागांची अंमलबजावणीही केली जाईल. पुनर्रचनेनंतर संसदेतील प्रतिनिधित्व कमी होईल, याबद्दलची काळजी दाक्षिणात्य राज्यांनी यापूर्वीच प्रकट केली आहे. दक्षिणी राज्यांनी कुटुंब नियोजनाचा प्रसार केला असून, आरोग्य व शिक्षणावर भर दिल्यामुळे त्यांची आर्थिक प्रगती उत्तम झाली आहे. त्यामुळे तेथील लोकसंख्येची वाढ तुलनेने कमी आहे. परिणामी, आपले मतदारसंघ घटतील, अशी भीती त्यांना वाटते. याउलट उत्तरेकडील राज्यांची लोकसंख्या जास्त असल्याने, तेथील मतदारसंघांची संख्या वाढलेली असू शकते. याबाबतच्या दाक्षिणात्य राज्यांच्या शंकांचे निरसन होणे आवश्यक आहे. २००२ मध्ये वाजपेयी सरकारने घटनादुरुस्ती करून मतदारसंघ पुनर्रचना २५ वर्षे पुढे ढकलली. २०२६ नंतर होणार्या जनगणनेची आकडेवारी प्रसिद्ध झाल्यानंतरच ती हाती घेण्यात येणार होती. याचा स्पष्ट अर्थ असा की, २०३१ च्या जनगणनेनंतरच मतदारसंघांचे काम हाती घेतले जाणार होते; पण आता पुनर्रचना २०२७ मध्येच हाती घेतली जाणार असून, ही प्रक्रिया वर्षभराच्या आत पूर्ण केली जाईल. त्यामुळे २०२९ च्या लोकसभा निवडणुका नवीन मतदारसंघांनुसार पार पडतील. महिला आरक्षण विधेयकाची अंमलबजावणीही तेव्हाच होईल. महिलांसाठी आरक्षित मतदारसंघांची संख्या वाढल्यानंतर, त्या-त्या ठिकाणी निवडून आलेले खासदार आता आमचे काय होणार, म्हणून कदाचित भ-ांतचित्त होतील.

स्वतंत्र भारतातील पहिली जनगणना १९५१ मध्ये झाली होती. केवळ शिरगणती न करता, देशातील साक्षरता, स्त्री-पुरुष प्रमाण आदी अनेक गोष्टींचे सर्वेक्षणही सर्वप्रथमच करणारी ही जनगणना वैशिष्ट्यपूर्ण ठरली. १९४७ नंतर आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी योजना आखण्याच्या दृष्टीने १९५१ च्या पहिल्या जनगणनेची आखणी केली गेली. बि-टिश राजवटीत प्रत्येक जनगणना करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपाची व्यवस्था असे. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण करण्याचा निर्णय घेतला आणि केंद्रीय गृहखात्यांतर्गत जनगणना आयुक्तांची नेमणूक करण्यात आली. तसेच ३ सप्टेंबर १९४८ रोजी 'सेन्सस ॲक्ट' संमत करून घेण्यात आला. त्या कायद्यान्वये, जनगणना अधिकार्यांकडे घरोघरी जाऊन माहिती मिळवण्याचे अधिकार प्राप्त करण्यात आले. १९४९ मध्ये आर. ए. गोपालस्वामी यांची पहिले जनगणना आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यांच्याच नेतृत्वाखाली स्वतंत्र भारतातली पहिली जनगणना १९५१ मध्ये पार पाडण्यात आली. यामध्ये भारताची लोकसंख्या ३६ कोटी असल्याचे निष्पन्न झाले. स्त्रियांचे पुरुषांशी प्रमाण दरहजारी ९४६ असल्याचे नोंदवले गेले. भारत स्वतंत्र झाला, तेव्हा आपल्याकडे १७ टक्के लोक साक्षर होते आणि केवळ १८ टक्के लोक शहरांत राहत होते. फाळणीनंतर भारतात एकूण ७५ लाख लोक स्थलांतरित झाले. त्यातील ४९ लाख लोक पश्चिम पाकिस्तानातून, तर २६ लाख लोक पूर्व पाकिस्तानातून आले होते. यामुळे हिंदूंचे प्रमाण ६९ टक्क्यांवरून ७५ टक्क्यांवर गेल्याचे जनगणनेतून निदर्शनास आले. त्यावेळी भारतात सहा कोटी लोक शहरांत आणि ३० कोटी ग्रामीण भागात वास्तव्य करून होते. कोरोनामुळे २०२१ ची जनगणना पुढे ढकलणे भाग पडले.

खरे तर २०२३ वा २४ मध्येच हे काम सुरू करता आले असते. राज्यघटनेत केंद्राच्या यादीत जनगणना हा विषय येतो. याचा अर्थ, केवळ केंद्र सरकारलाच ती घेण्याचा अधिकार आहे; मात्र जनगणना किती मुदतीनंतर घ्यायला पाहिजे, याचा उल्लेख १९४८ च्या जनगणना कायद्यात नाही. त्यामुळे दर दहा वर्षांनी जनगणना घेण्याचा संकेत असला, तरी ती घेतलीच पाहिजे, असा नियम नाही. घरांची मोजदाद किंवा खानेसुमारी व घरांना क्रमांक देणे आणि लोकसंख्येची मोजदाद हा क्रम ठरलेला असतो. जनगणनेपूर्वी एक वर्ष अगोदर ही कामे सामान्यतः एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत पूर्ण केली जातात. जनगणनेच्या वर्षी फेब्ुवारीच्या उत्तरार्धात प्रत्यक्ष काम हाती घेतले जाते. १६ व्या वित्त आयोगाचा अहवाल २०२५ च्या अखेरीस संमत होईल. केंद्र आणि राज्ये यांच्यात आर्थिक साधनसंपत्तीचे वाटप करणे, ही या आयोगाची जबाबदारी असते. जनगणना अहवालातील निष्कर्षांचा वित्त आयोगाच्या शिफारशींवर यावेळी तरी परिणाम होईल असे वाटत नाही. याचे कारण, जनगणना अहवालच २०२६ मध्ये सादर होणार नाही; मात्र भविष्यकाळात त्या-त्या राज्यांतील लोकसंख्या आणि मतदारसंघ या बाबी वित्त आयोगाला विचारात घ्याव्या लागतील.महिला आरक्षण विधेयक मागच्या लोकसभेच्या अखेरच्या टप्प्यात मंजूर झाले; पण महिला आरक्षण प्रत्यक्षात २०३६ मध्येच अमलात येईल, असा नकारात्मक सूर विरोधी पक्षांनी लावला होता. पण जातनिहाय जनगणना होणार की नाही, याबाबत अद्याप अनिश्चितता आहे. अशी जनगणना व्हावी, असे आग्रही मत केवळ काँग्रेस नेते राहुल गांधीच मांडत होते असे नाही, तर संयुक्त जनता दल, लोकजनशक्ती पक्ष, अपना दल हे एनडीएतील पक्ष तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही जातनिहाय जनगणनेची मागणी केली आहे. याप्रकारे जनगणना घेतली गेल्यास अतिदलित व अतिमागास जातींचाही तपशील हाती येऊ शकेल आणि विकास प्रक्रियेत मागे राहिलेल्या लोकांना वरील आर्थिक स्तरात आणण्यासाठी योजना आखता येतील. म्हणूनच सत्ताधारी पक्ष वा विरोधकांनी यावरून राजकारण न करता, जनगणना सर्वसमावेशक कशी होईल, याचा विचार प्राधान्याने केला पाहिजे.

# गेले तारांगण व्यापुनी

वसुबारसला सुरू झालेली दिवाळी पुढील काही दिवस राज्यासह देशभर जोरात साजरी होणार आहे. नवे कपडे, फराळाचे पदार्थ, असंख्य झगमगणारे दिवे आणि आतषबाजी ही आपल्या दिवाळीची मुख्य वैशिष्ट्ये आहेत. सध्याचे राजकीय अवकाश पण अनेक दिव्यांनी बहरून गेलेले आहे. वेगवेगळी चिन्हे लावलेले असंख्य आकाशकंदील राज्यभरात चमकण्याचा प्रयत्न करत आहेत. काही आकाशकंदिलांवर कमळ, घड्याळ, धनुष्यबाण, तुतारी, मशाल, पंजा आणि रेल्वेचे इंजिन अशी चिन्हे मढविलेली आहेत. तुम्हास वाटेल की, चिन्हे लावलेलाच आकाशदिवा अधिकृत असतो; पण प्रत्येक वेळी तसे असतेच असे नाही. काही पक्षांनी आपल्या मित्रपक्षांच्या विरुद्ध आपले स्वतःचे काही उमेदवार अपक्ष म्हणून उभे केलेले आहेत. हा एकमेकांना काटशह देण्याचा प्रकार संपूर्ण राज्यभर जोमात सुरू आहे. राजकीय दिवाळीमधील आकाशकंदिलांच्या या गदारोळानंतर जे निवडून येतील, असा प्रत्येक मतदारसंघात एकच आकाशदिवा पुढील पाच वर्षे नभांगणात तळपणार आहे. निवडणुकांचे निकाल लागल्याबरोबर न निवडून आलेले



आकाशदिवे आपोआप खाली येऊन पृथ्वीवर स्थिर राहतील.

राजकीय नेत्यांचे आणखी एक वैशिष्ट्य असते. विधानसभेचे निकाल त्रिशंकू आले तर हाताशी असावेत म्हणून काही सामर्थ्यशाली अपक्षांच्या ते आधीच संपर्कात असतात. निवडणुकांचे कल समजताच पुढे संध्याकाळपर्यंत काय निकाल लागतील, याचा अंदाज घेऊन निवडून येऊ शकणार्या अपक्षांना तत्काळ संपर्क केला जातो. शिट्टी, पिपाणी, नारळ, कपबशी, टीव्ही किंवा कोणते तरी चिन्ह घेऊन निवडून आलेल्या अपक्षांना निकालानंतर मोठीच डिमांड असते. एवढ्या सगळ्या गदारोळात कुठलेही राष्ट्रीय पक्षाचे चिन्ह नसताना अवघ्या पंधरा-वीस दिवसांत आपले चिन्ह घराघरांत पोहोचवून निवडून येणारा अपक्ष हा काही साधा माणूस नसतो महाराजा! कोणत्याही पक्षाची बांधिलकी नसणारा अपक्ष एकदा का निवडून आला की, स्वतःच्या मनाचा राजा असतो. 'जिकडे कमी, तिकडे आम्ही' या पद्धतीने तो निकालानंतर महिनाभरातच उखळ पांढरे करून घेत असतो. निवडणूक निकालाने त्याच्या हातात पैसे ओढण्याचे खोरे दिलेले असते आणि त्यातून तो आपल्या पुढील तीन पिढ्या तरी आरामात जगतील एवढे अवघ्या पंधरा दिवसांत कमावून घेतो. सध्या अपक्षांचे आकाशकंदील जोरात झेप घेत आहेत. दिवाळीचा सण आणि राजकीय दिवाळी यांची धूम एकाच वेळी पाहण्याची संधी महाराष्ट्रातील नागरिकांना या वर्षी मिळाली आहे. तुम्हाला प्रश्न पडत असेल की, ज्या लोकांना आपल्या गल्लीतही कोणी ओळखत नाही असे लोक अर्ज का भरत असतील? मंगळवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी प्रत्येक मतदारसंघात वीस-पंचवीस तरी किरकोळ उमेदवारांनी अर्ज भरलेले आहेत. यातील ९० टक्के लोक अर्ज मागे घेण्याच्या तयारीत आहेत. प्रमुख उमेदवारांनी फार नाही, तर चार-पाच लाख दिले तरी अर्ज परत घेतो, अशी त्यांची भूमिका असते. त्यांची इच्छा पूर्ण झाली की, ते अर्ज मागे घेतात आणि निवांत घरी जाऊन बसतात. काहीही न करता पैसे कमावण्याची ही शक्कल तुम्हालाही जमली तर करून पाहा.

# प्राचार्य डॉ.अविनाश मोहरील- एक बहुआयामी व्यक्तिमत्व

एम.ए. इंग्रजी या विषयात सुवर्णपदक प्राप्त करून पहिल्याच अटेम मध्ये सेट परीक्षा उत्तीर्ण करणारे, उच्च शिक्षण क्षेत्रात १९९६ पासून वेगवेगळ्या पदावर सेवा देणारे, प्राध्यापक, अधिष्ठाता, उत्कृष्ट वक्ता, साहित्यिक, लेखक, समुपदेशक, प्रशिक्षक, असे बहुआयामी व्यक्तिमत्व असणारे महिला महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. अविनाश मोहरील सरांना वाढदिवसानिमित्त अनंत हार्दिक शुभेच्छा! डॉ.अविनाश मोहरील सरांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांमध्ये २०१९ ते २२ पर्यंत अधिष्ठाता म्हणून कार्य केले आहे. विदर्भ साहित्य संघाच्या अमरावती शाखेचे उपाध्यक्ष म्हणून त्यांच्याकडे जबाबदारी आहे.दीप शाखा सैनिकी शाळेच्या व्यवस्थापनाचे ते कार्यकारी सदस्य आहे. थोडा है थोडी की जरूरत है या सदर अंतर्गत सरांनी दैनिक हिंदुस्थान वर्तमानपत्रांमध्ये लिखाण केले आहे, याच विषयावर त्यांचे पुस्तक देखील प्रकाशित आहे. सहजच फोटो thought ही पुस्तके मेझॉन वर सरांची प्रकाशित आहे,त्यांचे पन्नासहून अधिक शोधनिबंध प्रकाशित आहे. सर NAAC मूल्यांकन सदस्य आणि नव्या शैक्षणिक धोरणाचे पुरस्कारक आहे. सरांनी आजतागायत प्रभावी संवाद, व्यक्तिमत्व विकास,शिक्षक विकास, इंग्रजी भाषा विकास, नेतृत्व विकास, तान नियोजन, कौशल्य विकास,विवाहपूर्व समुपदेशन, चांगले पालकत्व इत्यादी विषयावर कार्यशाळा आयोजित करून मार्गदर्शन केले आहे.सरांच्या व्यक्तिमत्वातून आणि कार्यकर्तृत्वातून मला नेहमीच स्वामी विवेकानंदांच्या विचारांची आठवण होते ते म्हणजे, उठा जागे व्हा आणि तोपर्यंत थांबू नका जोपर्यंत तुमचे ध्येय पूर्ण होत नाही. महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून विविध कार्यक्रमाच्या अनुषंगाने सरांचे मार्गदर्शन आम्हाला नेहमीच लाभते. नुकतेच एका कार्यक्रमांमध्ये विद्यार्थिनींना संबोधित करताना त्यांनी सुंदर उदाहरण दिले आणि ते म्हणाले,लहानपणी आई-वडील आपल्याला घास भरवितात, मोठे झाल्यावर आपण आपल्या हाताने जेवण करतो,पण जीवनात अशीही वेळ येते,जेव्हा आपल्या ताटातले अन्न सुद्धा आपल्यालाच मिळवावे लागते, त्याकरता मेहनत करावी लागते, म्हणून जीवनात स्वाभिमानी व्हा,स्वतःच्या पायावर उभे व्हा आणि आई-वडिलांचे स्वप्न साकार करा, हा संदेश प्राचार्य म्हणून सरांचा नेहमीच विद्यार्थिनींना असतो. विद्यार्थिनींच्या विकासाकरिता विविध प्रकारचे उपक्रम राबविण्याचे प्रयत्न त्यांच्याकडून केले जातात. महाविद्यालयातील गरीब,होतकरू विद्यार्थिनींना गणवेश, प्रवेश शुल्क, परीक्षा शुल्क ,सायकल इतर शैक्षणिक साहित्य याकरिता मदत करण्यासाठी सरांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक सहाय्य निधी समितीची स्थापना २०१३ मध्ये महाविद्यालयात करण्यात आली. या समितीद्वारा आजतागायत हजारो गरीब, होतकरू विद्यार्थिनींना आर्थिक मदत करण्यात आली आहे.



शिक्षक व शिक्षकेत्तरकर्मचाऱ्यांप्रतिही सरांची भूमिका नेहमीच प्रेरणादायी राहिली आहे. २०१८ मध्ये जेव्हा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठामध्ये सॉफ्ट स्किल ट्रेनर करिता ट्रेनिंग सुरू झाले तेव्हा पहिल्याच बॅच करिता डॉ. अंकुश गिरी व मला सरांनी आमच्या महाविद्यालयातून ट्रेनर होण्याकरिता पाठविले, ज्याचा फायदा पुढे महिला महाविद्यालयातील व इतरही महाविद्यालयातील असंख्य विद्यार्थिनींना झाला. आम्ही हे सर्व श्रेय डॉ. अविनाश मोहरील सरांना देतो. एकदा दूरदर्शनवर एका प्रसिद्ध गायकाची मुलाखत सुरू होती,त्या मुलाखतीतील प्रसंगाचा उल्लेख या ठिकाणी मला करावसं वाटतो. प्रसिद्ध गायकाला त्यांच्या गायनकलेबद्दल विचारण्यात आले, तेव्हा त्यांनी आपल्या कलेचे सर्व श्रेय रसिक प्रेक्षकांना दिले. त्यांनी सांगितले की, कलाकार कितीही मोठा झाला तरी त्याच्यामध्ये नम्रता असली पाहिजे, कारण कलाकाराला हे मोठेपण प्रेक्षकांतूनच मिळत असते आणि म्हणूनच म्हटले जाते की, बहरलेल्या वृक्षाच्या फांद्याच नेहमी झुकलेल्या असतात. एक प्रभावी प्राचार्य म्हणून सरांनी नेहमीच आपल्या यशाचे श्रेय आपल्या सर्व टीमला दिले आहे. त्यांनी स्वतःचा कधीही अभिमान बाळगला नाही याची पावती म्हणजे २०२१ मध्ये महाराष्ट्र शासनाने सरांना बहाल केलेला सर्वोत्कृष्ट प्राचार्य हा पुरस्कार होय. शिस्त आणि आत्मनियंत्रणाशिवाय संतुलन राखता येत नाही. संतुलनात आणि स्थिरतेत प्राविण्य प्राप्त केलेले डॉ.अविनाश मोहरील एखादेवेळी-कधीकधी संतापही संतुलन ठेवून व्यक्त करतात. ही खूप मोठी कला त्यांच्याकडे आहे. सायकोथेरपी आणि कौन्सिलिंग मध्ये सरांनी पीजी डिप्लोमा आणि मास्टर्स ची पदवी प्राप्त केल्यामुळे निश्चितच ही सहजता सरांच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये झळकते.सर प्रभावी कौन्सिलर आहेत. विशेषतः ताण नियोजनावर त्यांचे कार्य आहे. नुकतेच सर्व वयोगटातील लोकांसाठी होप कॉन्सिलिंग सेंटर त्यांनी सुरू केले आहे. सरांच्या या कौशल्यातून शिव खेडा यांच्या 'आपण जिंकू शकता' या पुस्तकातील एका सुंदर वाक्याचा उल्लेख करावासा वाटतो ते म्हणजे स्वयंसुधारणेसाठी इतका वेळ द्या की, इतरांवर टीका करण्यासाठी वेळच उरणार नाही, इतके मोठे बना की शूद्र संताप,रागलोभ यांचा वाराही तुमच्या मनाला लागणार नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्राचार्य डॉ.अविनाश मोहरील सर होय. सरांना पुनश्च वाढदिवसाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा!

**प्रा.डॉ.प्रवीण ज. गुल्हाने**
**महिला महाविद्यालय**
**अमरावती.मो.न.९३२५६३०९६६**




## फराळ पाहून तोंडाचा ताबा सुटतो? तळलेले पदार्थ खाण्यापूर्वी लक्षात ठेवा ५ गोष्टी; पोट बिघडणारच नाही

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक**

दिवाळी म्हटलं की फराळ खाणं आलंच. शिवाय मिठाईही आपण दाबून खातो दिवाळीआधी आणि दिवाळीनंतर आपण डाएट, पथ्य बाजूला ठेवून, मिठाईचा आस्वाद लुटतो. कितीही जिभेवर ताबा ठेवण्याचा प्रयत्न केला तरी, आपले हात आपोआप मिठाई आणि फराळाकडे वळतात. पण जास्त प्रमाणात खाल्ल्याने तब्येत बिघडू शकते. शिवाय आरोग्याचेही नुकसान होऊ शकते.



अशावेळी हेल्दी पदार्थ खाऊनही ते व्यवस्थित पचत नाही. मुख्य म्हणजे मसालेदार आणि तेलकट पदार्थ खाल्ल्याने गॅस्ट्रिकची समस्या निर्माण होते. यामुळे खराब पचन, आम्लपित्त, गॅस, बद्धकोष्ठता, पोट आणि छातीत जळजळ, उलट्या आणि जुलाब इत्यादी स्मास्या छळतात. त्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार विविध औषधांचा वापर आपण करत असतो. पण औषधांचा वापर न करता आपण गॅस्ट्रिकच्या समस्येपासून सुटका मिळवू शकता

**तेलकट पदार्थ खाणं टाळा**

दिवाळीत जास्त तेलकट पदार्थ खाणं टाळा. हिवाळ्यात जास्त तेलकट पदार्थ खाल्ल्याने गॅस्ट्रिकचा त्रास होऊ शकतो. शिवाय वजनही वाढतं. अपचनामुळे हेल्दी पदार्थ खाऊनही व्यवस्थित पचत नाही. त्यामुळे नाश्ता किंवा रात्रीच्या वेळेस जास्त तेलकट पदार्थ खाणं टाळा.

**फायबर-** आपल्या आहारात फायबर समृद्ध पदार्थांचा समावेश करा. जेणेकरून पचनक्रिया सुरळीत होईल. तुमचं पोट अचानक भरल्यासारखं वाटणार नाही. जेवणासोबत आपण फायबर समृद्ध सॅलडही खाऊ शकता.

**जास्त पाणी प्या-** शरीराला हायड्रेट ठेवा. जास्त पाणी प्या. दररोज निदान ३-४ लिटर पाणी अवश्य प्या. यामुळे पचनक्रियेत अडथळे येणार नाही.

**व्यायाम करा**

गॅस्ट्रिकची समस्या टाळण्यासाठी नियमित व्यायाम करायला हवे. व्यायाम आणि योगासना करत राहा. यामुळे खाल्लेलं व्यवस्थित पचेल.

**अन्न नीट चावून खा**

अन्न नीट चावून खा. भरभर खाल्ल्याने अन्नाचे तुकडे होत नाही. ज्यामुळे पचनक्रियेत अडचण निर्माण होते. त्यामुळे अन्न नेहमी नीट चावून खावे.

# शेतकऱ्यांनो पीएम किसान योजनेत आले नवीन नियम वाचा सविस्तर

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक**

पीएम किसान योजनेसाठी शासनाकडून नवीन नियमावली तयार करण्यात आली आहे. नवीन नियमावलीमध्ये वारसा हक्क वगळता २०१९ पूर्वी जमीन खरेदी केली असेल तर त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

दरम्यान, आता पीएम किसानसाठी नाव नोंदणी करताना पती-पत्नी व मुलांचे आधार कार्ड सोबत जोडावे लागणार आहे. कुटुंबातील एकालाच लाभ मिळणार आहे.

केंद्र शासनाने २०१९ मध्ये शेतकऱ्यांसाठी पीएम किसान सन्मान योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत शेतकऱ्याला वर्षाला तीन हप्त्यात सहा हजार रुपये दिले जातात. आता राज्य शासनाने ही योजना सुरू केली आहे.वर्षाला लाभार्थी शेतकऱ्याला तीन हप्त्यात सहा हजार रुपये मिळत आहेत. या योजनेत शेतकरी म्हणून एकाच कुटुंबातील पती-पत्नी यापैकी एका व्यक्तीला अथवा अठरा वर्षावरील मुलांना याचा लाभ घेता येतो.उताऱ्यावर २०१९ पूर्वी नोंद असेल अथवा वारसा हक्काने नाव नोंद असेल तर या योजनेचा लाभ मिळणार आहे. मात्र, या योजनेत लाभ घेण्यासाठी पती-पत्नी व मुलगा तसेच २०१९ नंतर जमीन नावावर झालेले तसेच माहेरवाशिणीकडून जमीन आपल्या नावावर असल्याचे दाखवून दोन्हीकडून लाभ घेत असल्याचे निदर्शनास आहे.पात्र लाभार्थी शेतकऱ्याचे निधन झाले असेल तर कुटुंबातील एकाच व्यक्तीला याचा लाभ घेता येणार आहे.




### आवश्यक कागदपत्रे

लाभार्थी शेतकऱ्याचा नवीन सातबारा उतारा.

शेतकऱ्याचा आठ अ उतारा.

लाभार्थी शेतकऱ्यांच्या पती-पत्नीचे आधार कार्ड.

लाभार्थी शेतकऱ्यांचा फेरफार.

विहित नमुना अर्ज.

शिधापत्रिका.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026



# भाजप, काँग्रेसमधल्या बंडखोरीने अधिकृत उमेदवरांच्या अडचणी वाढल्या; वाद मिटवण्यासाठी मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज करण्याचा आजचा शेवटचा दिवस होता. उमेदवारी अर्ज भरण्याची वेळ संपल्यावर महायुती आणि महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला अखेर समोर आला आहे. मात्र उमेदवारी न मिळाल्याने किंवा आयत्या वेळी पक्षात प्रवेश केलेल्या उमेदवारी मिळाल्याने निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेल्यांमध्ये नाराजी पसरली आहे. याच नाराजीतून अनेकांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. पण आता या बंडखोरी केलेल्या अपक्ष उमेदवरांचा फटका पक्षाच्या अधिकृत उमेदवारांना बसणार आहे. अमरावती जिल्ह्यातही असेच काहीसे चित्र पाहायला मिळत आहे.

लोकसभेला झालेल्या सांगली पॅटर्नची पुन्हा एकदा जिल्ह्यात पुनरावृत्ती होताना दिसत आहे.जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघामधील प्रमुख पक्षांच्या लढतीचे चित्र स्पष्ट झालय. मात्र असे असले तरी सात मतदारसंघात अधिकृत उमेदवारांची बंडखोर उमेदवारांमुळे चांगलीच कोंडी झालीय. बंडखोरीचा सर्वाधिक फटका




भाजप आणि काँग्रेसला बसणार आहे. भाजपला तिवसा,बडनेरा,अचलपूर,अमरावती या चार मतदारसंघात, तर काँग्रेसला दर्यापूर ,मोर्शी/वरुड या मतदार संघात बंडखोरीचा सामना करावा लागणार आहे.लोकसभा निवडणुकीत सांगलीत अपक्ष उमेदवार विशाल पाटील यांनी निवडणूक जिंकून सर्वांनाच आश्चर्यचकित केलं होतं. विधानसभेलाही असाच निकाल लागेल या अपेक्षेने बंडखोरांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. दरम्यान, या सगळ्यात पक्षाच्या अधिकृत उमेदवारासमोरील अडचणी वाढल्या आहेत. त्यामुळे अधिकृत उमेदवारांनी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडे वाद मिटविण्याची मागणी केली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख ४ नोव्हेंबर असल्याने उमेदवारांकडून बंडखोरांचे बंड शमविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

# विधानसभा निवडणूक निरीक्षक जिल्ह्यात दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

:विधानसभा सार्वत्रिक




निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाने जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघासाठी निरीक्षकांची नेमणूक केली आहे. येत्या विधानसभा निवडणुकीसाठी चार सामान्य निरीक्षक, दोन खर्च निरीक्षक आणि एक पोलिस निरीक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणुकीतील तक्रारींच्या अनुषंगाने धामणगाव रेल्वे, बडनेरा या मतदारसंघासाठी रवी रंजन कुमार विक्रम व अमरावती आणि तिवसा मतदारसंघासाठी श्याम लाल पुनिया, दर्यापूर मतदारसंघासाठी लक्ष्मीशा जी, अचलपूर आणि मोर्शी मतदारसंघासाठी विधान चंद्र चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खर्च निरीक्षक म्हणून धामणगाव, बडनेरा, अमरावती आणि तिवसासाठी वेंकान्ना तेजावय आणि दर्यापूर, मेळघाट, अचलपूर, मोर्शी या मतदारसंघासाठी उमा माहेश्वरी तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस निरीक्षक म्हणून बत्तुला गंगाध नियुक्ती करण्यात आली आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने तक्रारीचे निराकरण करण्यासाठी निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## तिवसाचे आब्झर्व्हर पोहोचले अमरावतीत

अमरावती व तिवसा विधासभा मतदार संघासाठी मूळचे राजस्थान व दिल्ली येथे भारतीय प्रशासकीय सेवेत कार्यरत असलेले श्याम लाल पुनिया हे निवडणूक निरीक्षक म्हणून आज अमरावतीत दाखल झालेले आहे. तिवसा विधानसभा मतदार संघाच्या निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी निवडणूक आयोगामार्फत त्यांची नियुक्ती केलेली असून सामान्य नागरिकांच्या निवडणूक विषयक काही तक्रार किया सूचना असतील तर श्याम लाल पुनिया, निवडणूक निरीक्षक यांच्याशी सकाळी १० ते ११ वेळेत मुख्य शासकीय कीय विश्रामगृह येथे संपर्क साधता येणार आहे.

# निवडणुकीत जार अन् कुणाला मिळणार हार
## निवडणूक चिन्हांवर अपक्ष उमेदवारांचा जोर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती** निवडणूक कोणतीही असली तरी त्यामध्ये निवडणूक चिन्हाचे वेगळे महत्त्व आहे. मतदारांच्या लक्षात राहावे, यासाठी निवडणूक चिन्हांवर उमेदवारांचा अधिक जोर असतो. यावेळी ४ नोव्हेंबरला निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येणार आहे. यामध्ये राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांसाठी ११ चिन्ह राखीव आहे, तर अपक्षांना १९० मुक्त चिन्ह आहेत. यामध्ये कुणाच्या वाट्याला मण्यांचा हार, तर कुणाला पाण्याचा (हंडा) जार मिळणार आहे.निवडणूक चिन्हांवरून राजकीय पक्षांची कुरघोडी, त्यानंतर सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचलेला राजकीय वाद महाराष्ट्राने पाहिला आहे. यावरून निवडणूक चिन्हाचे महत्त्व अधोरेखितहोते. राज्य विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय मान्यताप्राप्त पक्षांसाठी सहा चिन्हे राखीव आहेत. यामध्ये पंजा, कमळ, झाडू, हत्ती, विळा हातोडा तारा व पुस्तक या चिन्हांचा समावेश आहे. याशिवाय राज्य मान्यताप्राप्त पक्षांसाठी पाच चिन्हे राखीव आहेत. धनुष्यबाण , मशाल, घड्याळ , तुतारी व रेल्वे इंजिनचा समावेश आहे. याशिवाय नोंदणीकृत , परंतु अमान्यप्राप्त असलेल्या पक्षांसाठी देखील निवडणूक चिन्हे राखीव ठेवण्यात येतात. सद्यःस्थितीत अशा प्रकारच्या २६ पक्षांचे पत्र जिल्हा निवडणूक विभागाला प्राप्त आहेत.

# स्थानिक संस्थांच्या निवडणुका रखडल्याने इच्छुकांची वाढली गर्दी
## निवडणुका लांबल्याने काहींची थेट विधानसभा निवडणुकीत एन्ट्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती** :गेल्या दोन-तीन वर्षांपासून जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका आणि बाजार समितीच्या निवडणुका झाल्याच नाहीत. त्यामुळे महापालिकांचे भावी महापौर, नगरसेवक, जिल्हा परिषदेचे भावी अध्यक्ष, सदस्य, सभापती त्याचबरोबर बाजार समितीचे भावी सभापती, उपसभापती आणि संचालक यांना कुठेच संधी मिळाली नाही. त्यामुळे यापैकी काही जणच विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक झाल्याने गर्दी वाढली आहे. त्याचा फटका विविध पक्षांतील उमेदवारांनाबसण्याची शक्यता आहे. जिल्हा परिषदेतील सदस्य महापालिकेतील नगरसेवकांचा कार्यकाल संपून जवळपास दोन-तीन वर्षे झाली आहेत.




सरकारने विविध कारणे देत स्थानिक स्वराज्य संस्थांसह बाजार समितीच्या निवडणुका न घेतल्याने शेकडो नेते, पदाधिकारी हे विधानसभों निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक झाले आहेत. ते उमेदवारी मिळावी यासाठी पक्षावर दबावतंत्राचा वापर करत असल्याचे चित्र सध्या जिल्ह्यासह राज्यात दिसत आहे.जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका आणि बाजार समितीच्या निवडणुका वेळेवर झाल्यास विविध पक्षांतील अनेक नेत्यांना महापौर, नगरसेवक, जिल्हा परिषद अध्यक्ष,सभापती, सदस्य, बाजार समिती सभापती, उपसभापती, संचालक अशी अनेक पदे मिळाली असती. त्यामुळे ते नेते विधानसभा निवडणुकीत इच्छुक झाले नसते.मात्र, महायुती सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न घेतल्याने सर्वच पक्षांचे अनेक नेते विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून तयार झाले आहेत. त्यामुळे इच्छुकांतून कोणाला उमेदवारी देतानाच मोठी कसरत झाली आहे.विधानसभा निवडणुकीत स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रतिनिधित्व केलेले पदाधिकारी मैदानात उतरल्याने निवडणुकीची रंगत वाढली आहे.

# नवाब मलिकांना उमेदवारी दिल्यानं भाजपा नाराज
## मलिक यांचा प्रचार करणार नसल्याचं केले स्पष्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई** - विधान सभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी एक नव्हे, तर दोन उमेदवारी अर्ज दाखल करून नवाब मलिक हे मानखुर्द - शिवाजी नगर मतदार संघातून निवडणुकी च्या मैदानात उतरले आहेत. परंतु भाजपा मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांनी नवाब मलिक यांच्या प्रचारास पूर्णपणे नकार दिला आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून नवाब मलिक यांना उमेदवारी दिल्यानं भाजपानं नाराजी व्यक्त केली आहे. नवाब मलिक यांच्यावर गंभीर आरोप असल्या नं भाजपा सातत्यानं त्यांना महायुतीतून दूर करण्याचा प्रयत्न करत असतानाही नवाब मलिक यांना अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून मानखुर्द - शिवाजीनगरमधून तर त्यांची मुलगी सना मलिक हिला अणुशक्ती नगरमधून उमेदवारी देऊन एकप्रकारे भाजपाला डिवचलं आहे.नवाब मलिक



यांचा प्रचार करणार नाही : भाजपाची भूमिका ही सुरुवातीपासून स्पष्ट राहिली आहे. महायुतीमधील सर्व घटक पक्षांनी आपापले उमेदवार आपणच ठरवायचे आहेत. परंतु विषय फक्त राष्ट्रवादी काँग्रेसनं नवाब मलिक यांना दिलेल्या उमेदवारीबाबत आहे. यासंदर्भात भाजपाची भूमिका यापूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मीही वारंवार स्पष्ट केली आहे. आता पुन्हा एकदा सांगतोय, भाजपा कुठल्याही परिस्थितीमध्ये नवाब मलिक यांचा प्रचार करणार नाही. आमची भूमिका ही नेहमी दाऊद आणि दाऊदशी संबंधित केससंदर्भातील व्यक्तीच्या प्रचाराची नाही, असं मुंबई भाजपा अध्यक्ष आशिष शेलार यांनी स्पष्ट केलं.

# आज पासून उमेदवारांच्या निवडणूक खर्चाचे मीटर झाले सुरू
## निवडणूक प्रचार साहित्याचे दर जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती** :विधान सभेसाठी उमेदवारी अर्ज भरताच उमेदवारांच्या खर्चाचे मीटर सुरू होत आहे. अनेक उमेदवारांनी अर्ज भरले असून, प्रचारासाठी झालेला दैनंदिन खर्च निवडणूक विभागाच्या खर्च नियंत्रण समितीला सादर करावा लागत आहे. दरम्यान, खर्च नियंत्रण समितीने राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत प्रचार साहित्यांचे दर निश्चित केले आहेत. त्यानुसार जेवण थाळीसह अन्य वस्तूंचे दर निश्चित केले आहेत.

४ नोव्हेंबरनंतर आठ विधानसभा मतदारसंघांतील निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे. उमेदवारांच्या सभा, बैठका, रॅली व इतर खर्चावर



निवडणूक विभागाच्या विविध पथकांचा वॉच ठेवला जात आहे. त्यामुळे दररोजचा होणारा खर्च दुसऱ्या दिवशी सादर करताना उमेदवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांची दमछाक होणार आहे. व निर्देशानुसार जिल्हा निवडणूकविभागाने जिल्हा खर्च नियंत्रण समिती स्थापन केली असून, या समितीने प्रचारासाठी आवश्यक असणारे विशिष्ट घटकांचे बाजारातील सध्याचे दर मागवून घेतले. त्यानंतर जिल्हाभरातील विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक घेऊन प्रचार साहित्याचे, तसेच भोजनावळीचे दर निश्चित केले आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी उमेदवारांना ४० लाख रुपयांपर्यंत खर्च करण्यास निवडणूक आयोगाने मुभा दिली आहे. उमेदवारी अर्ज दाखल होताच उमेदवारांना प्रचारासाठी करण्यात आलेला खर्च दैनंदिन सादर करण्याची सक्ती केलेली आहे. अद्याप प्रचाराची रणधुमाळी प्रचार म्हटले की, कार्यकर्त्यांसाठी भोजन, नाश्ता, वाहने आली. प्रचारासाठी उमेदवारांनी कार्यकर्त्यांसाठी वापरण्यात आलेली वाहने उमेदवारांचे आणि पक्षाचे बॅनर आदींवर तसेच सभा बैठका आदींसाठी लागणारे मंडप, खुर्चा, वाहने आदींवर मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे.

# आली दिवाळी : सुक्या मेव्याच्या दरात वाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती-** दिवाळीच्या पार्श्वभूमीवरगोडधोड खाद्यपदार्थ बनवण्यासाठी सुक्या मेव्याचा वापर केला जातो. बाजारात सुक्या मेव्याला मागणी अधिक वाढली आहे. भंडारा शहरात सुका मेव्यांची दुकानेही चांगलीच सजली आहेत. दिवाळी सण म्हटला की, घरगुती स्वरूपाच्या वस्तू तयार करण्यासाठी गृहिणींकडून लाडू, शंकरपाळे, करंजी, चकली अशा इतर दर्जेदार वस्तू तयार करण्यासाठी सुका मेवा खरेदीचा कल असतो. तसेच दिवाळीत ड्रायफ्रूट्स मोठ्या प्रमाणात एकमेकांना भेट दिले जातात. दिवाळी आनंदाचा सण मानला जातो; परंतु



दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी घरोघरी तयार केला जाणारा लज्जतदार फराळ यंदाबाजारपेठेत खरेदीसाठी आला आहे. सणासुदीच्या काळात मित्र मैत्रिणींना, खतेवाइकांना भेट स्वरूपात है ड्रायफ्रूट्स बॉक्स देण्याचा ट्रेंड सध्या सुरू आहे. याचबरोबर दिवाळीदरम्यान सारखेच गोड पदार्थ खाऊन कंटाळा येतो, यासाठी मिठाईला पर्याय म्हणून 'गिफ्ट पॅक'साठी मागणी अधिक दिवाळीनिमित्त संस्था, संघटना, कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून सुका मेवा देत आहेत. दिवाळीत सुक्या मेव्याचे गिफ्ट पॅक देण्याची पद्धत हल्ली रूड झाली आहे. अशा गिफ्ट तयार करणाऱ्यांकडूनच सुक्या मेव्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मागणी अधिक व तुलनेने माल कमी असल्याने दर महाग होत आहेत.ड्रायफ्रूट्स महत्त्वाचे ठरताना दिसत आहेत. बाजारात सुट्या आणि पॅकिंग सुक्या मेव्याला मागणी आहे. तर वेगवेगळ्या आकारात आणि सुंदर पॅकेजिंगमध्ये ड्रायफ्रूट्स विक्रीला आलेले आहेत.

# राजू नमकीन मधून ३३० किलो बर्फी व हलवा जप्त
## इतवारा बाजार परिसरात धडाकेबाज कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती-** इतवारा बाजार येथील राजू नमकीन दुकानात गुन्हेशाखेचे पथक आणि अन्न व प्रशासन विभागाने संयक्त कारवाई करून ३३० किलो हलवा व बर्फी (किंमत ८७ हजार २९० रुपये) जप्त करून दुकानदाराला ताब्यात घेतले. राजेश नंदकिशोर साहू (वय ५० रा.इतवारा) असे दुकानदाराचे नाव आहे. इतवारा बाजार येथे राजेश साहू यांच्या

मालकीचे राजू नमकिन नावाने मिठाईचे दुकान आहे तसेच दुकानात ठेवलेल्या मिठाईच्या बॉक्सवर बॅच नंबर नाही आणि हलवा नियमानुसार ठेवलेला नाही तसेच खवा सुध्दा बनावट असल्याची माहिती गुन्हेशाखेच्या पथकाला मिळताच त्यांनी अन्न व

औषधी विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली. त्यानंतर मंगळवारी सायंकाळी



राजू नमकीन दुकानात घाड टाकली आणि दुकानाची पाहणी केली असता दुकानातील मिठाईच्या बॉक्सवर बॅच नंबर नव्हते. तसेच हलवा ज्या पध्दतीने व पाहिजे त्या तापमानात ठेवायला पाहिजे त्या पध्दतीने ठेवलेला नव्हता. तसेच एका प्लॅस्टीकच्या पोत्यात खवा दिसताच पोलिसांनी दुकानातील सर्व मिठाई, हलवा आणि खवा जप्त करून राजेश साहूला ताब्यात घेऊन कारवाई केली. सदरच्या कारवाईत अन्न व औषधी निरीक्षक गजानन घोरे, गुन्हेशाखेच्या पोलीस निरीक्षक सिमा दाताळकर, पोलीस कर्मचारी बबलु यवतीकर, शेखर रामटेके, विशाल वाकपांजर, मनोज ठोसर यांचा समावेश होता.



# विदर्भातील 'सीसीआय'चे ६१ कापूस खरेदी केंद्र सुरू

## प्रतिक्विंटल ७ हजार ५२१ रुपये हमीभाव जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३० अमरावती**

विदर्भात भारतीय कापूस महामंडळ अर्थात 'सीसीआय'ने ६१ कापूस खरेदी केंद्र सुरु केली आहेत. त्यासाठी प्रतिक्विंटल ७ हजार ५२१ रुपये हमीभाव जाहीर केला आहे. शेतकऱ्याने एफएक्यू दर्जाचा कापूस विक्रीसाठी आणला, तर तो खरेदीची आमची तयारी आहे,असे 'सीसीआय'चे अकोला क्षेत्रीय कार्यालयाचे उपमहाव्यवस्थापक नीरजकुमार यांनी सांगितले. 'सीसीआय'च्या माध्यमातून देशात यंदा ५०० केंद्रांच्या माध्यमातून कापूस खरेदी होणार आहे. महाराष्ट्र सध्या १२० केंद्र सुरू करण्यात आली असून, त्यातील निम्मे म्हणजे ६१ केंद्र ही विदर्भात आहेत. ८ ते १२ टक्के ओलावा आणि लांब धागा (२९.५ ते ३०.५ मिमी) अशा दर्जाच्या कापसासाठी ७५२१ रुपयांचा दर निश्चित करण्यात आला आहे. धाग्याच्या लांबीनुसार (स्टेपल लेंथ) विचारात घेऊन ६६२१ ते एक्स्ट्रॉ लॉग स्टेपल (अधिक लांबीचा धागा) साठी असा हमीदर दिला जाणार आहे. गेल्या १ ऑक्टोबरपासून विदर्भात 'सीसीआय'ची ६१ केंद्र सुरु झाली



आहेत. मात्र शेतकऱ्यांनी अद्याप एकाही केंद्रावर कापूस खरेदीसाठी आणला नाही. केवळ नोंदणी करुन ठेवली आहे. दिवाळी आटोपल्यानंतर शेतकरी कापूस विक्रीसाठी बाजारात आणि 'सीसीआय'च्या खरेदी केंद्रावर आणतील, अशी अपेक्षा आहे, असेही नीरजकुमार यांनी सांगितले.

**विदर्भातील ६१ केंद्र असे :**

अकोला : अकोट, अकोट 'ब', बार्शिटाकळी, बोरगाव मंजू, चिखलगाव, चोहोट्टा बाजार, हिवरखेड, मूर्तिजापूर, पारस, तेल्हारा.

अमरावती : अंजनगाव सुर्जी, भातकुली, चांदूर बाजार, दर्यापूर, धामगाव रेल्वे, नांदगाव पेठ, वरुड,येवदा.

बुलडाणा : चिखली, देऊळगाव राजा, जळगाव जामोद, खामगाव, खामगाव 'ब', मलकापूर, शेगाव, नांदुरा.

वाशीम : अनसिंग, कारंजा लाड, मंगरुळपीर.

यवतमाळ : दारव्हा, दिग्रस, घाटंजी, कळंब, खैरी, महागाव, मुकुटबन, पांढरकवडा, पुसद,राळेगाव,शिंदोळ I, वणी, यवतमाळ.

चंद्रपूर जिल्हा : भद्रावती, चंद्रपूर, चिमूर, राजुरा, सोनुर्ली,वरोरा.

नागपूर : नरखेड, सावनेर,उमरेड,आर्वी,क ळमेश्वर

वर्धा : आष्टी, देवळी, हिंगणघाट,पुलगाव,समुद्रपूर, सेलू, शिंदी रेल्वे, वायगाव.

# निवडणुकीत जार अन् कुणाला मिळणार हार
# निवडणूक चिन्हांवर अपक्ष उमेदवारांचा जोर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

निवडणूक कोणतीही असली तरी त्यामध्ये निवडणूक चिन्हाचे वेगळे महत्त्व आहे. मतदारांच्या लक्षात राहावे, यासाठी निवडणूक चिन्हांवर उमेदवारांचा अधिक जोर असतो. यावेळी ४ नोव्हेंबरला निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येणार आहे. यामध्ये राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांसाठी



११ चिन्ह राखीव आहे, तर अपक्षांना १९० मुक्त चिन्ह आहेत. यामध्ये कुणाच्या वाट्याला मण्यांचा हार, तर कुणाला पाण्याचा (हंडा) जार मिळणार आहे.

निवडणूक चिन्हांवरून राजकीय पक्षांची कुरघोडी, त्यानंतर सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचलेला राजकीय वाद महाराष्ट्राने पाहिला आहे. यावरून निवडणूक चिन्हाचे महत्त्व अधोरेखितहोते. राज्य विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय मान्यताप्राप्त पक्षांसाठी सहा चिन्हे राखीव आहेत. यामध्ये पंजा, कमळ, झाडू, हत्ती, विळा हातोडा तारा व पुस्तक या चिन्हांचा समावेश आहे. याशिवाय राज्य मान्यताप्राप्त पक्षांसाठी पाच चिन्हे राखीव आहेत. यामध्ये धनुष्यबाण, मशाल, घड्याळ, तुतारी व रेल्वे इंजिनचा समावेश आहे. याशिवाय नोंदणीकृत, परंतु अमान्यप्राप्त असलेल्या पक्षांसाठीदेखील निवडणूक चिन्हे राखीव ठेवण्यात येतात. सद्य:स्थितीत अशा प्रकारच्या २६ पक्षांचे पत्र जिल्हा निवडणूक विभागाला प्राप्त आहेत.

# नितेश राणे म्हणतात.... ये अंदर की बात है संजय राऊत हमारे साथ है

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०सिंधुदुर्ग**

विधानसभा निवडणूक सुरु आहे. अशात आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. सिंधुदुर्गमध्ये भाजपचे नेते नितेश राणे यांनी पत्रकार परिषद घेतली. तेव्हा शिवसेना ठाकरे गटाचे नेते, खासदार संजय राऊत यांच्याबाबत नितेश राणे यांनी मोठं विधान केलं आहे. हल्ली संजय राऊत आमच्या देवेंद्र फडणवीस साहेबांचे गोडवे गात आहेत. याला असं म्हणायचं का ये अंदर कि बात है संजय राऊत हमारे साथ है!, असं नितेश राणे म्हणालेत. एअर बस प्रकल्प गुजरातला नेला, असा आरोप संजय राऊत यांनी केला. त्यावर नितेश राणे यांनी भाष्य केलंय. संजय राऊत याला पत्रकार परिषदेत चपलांनी मारलं पाहिजे होते. ह्याला प्रत्येक गोष्टीत



मोदी साहेब दिसतात हा स्वत:च्या बायकोला नाव घेऊन हाक मारतो कि नरेंद्र मोदी बोलतो हे त्याला विचारलं पाहिजे, असं नितेश राणे म्हणालेत.

**ठाकरेंवर निशाणा**

शिवसेना उद्धव ठाकरे या पक्षाने आपलं नाव बदलून कचरा पार्टी नाव ठेवावं. कारण त्यांचं काँग्रेस कचरा करतंय. दिल्लीश्वरांच्या समोर मुजरा करुन सुद्धा उद्धव ठाकरेला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित नाही केला. बेडकासारखा फुगून आम्ही सेंच्युरी मारणार बोलणाऱ्या बालबुद्धी राऊतला हे समजत नाही. सेंचुरी मारण्यासाठी १०० जागा लढवाव्या लागतात. ८८ वर स्वत:च्या पक्षाला गुंडाळावं लागलं, अशी टीका नितेश राणे यांनी केली आहे.

भाजपसोबतचा इतिहास तपासा तेव्हा कसे होता राहुल गांधीच्या डाव्या उजव्या सोबत उद्धव ठाकरेला भागवावं लागत आहे. राहुल गांधी यांच्याजवळ पास पण नाही. सत्तेच्या भुके पाई उद्धव ठाकरे फडणवीस साहेबांचे फोन घेत नव्हता. आज राहुल गांधी याचे फोन घेत नाही याला नियतीचा फेरा म्हणतात, अशा शब्दात त्यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला आहे.

# पारधी बांधवांच्या 'काला गोटा'ला दिला अरविंद देशमुखांनी 'आकार'

## पारधी बांधवांचे सामाजिक परिवर्तन : ग्रामस्वच्छता आणि दीपावली मिलन सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नांदगाव पेठ**

शहरात असो की ग्रामीण भागात पारधी बांधव कायमचा दुर्लक्षित राहलेला समूह. घाण करतात, शिवीगाळ, मारहाण, चोऱ्या करतात हा कायमचा ठप्पा त्यांच्या माथी लागलेला आहे मात्र तिवसा मधील कुऱ्हा जवळ असलेल्या 'काला गोटा' या गावातील असंख्य पारधी समाजबांधवांच्या कपाळावरील हा ठप्पा कायमचा मिटवून त्या काला गोटामधील पारधी बांधवांचे समाजपरिवर्तन करण्यासाठी प्राचार्य अरविंद देशमुख यांचे प्रयत्न आज फळाला लागले आहेत. कुऱ्हा येथील श्रीराम कला महाविद्यालयात तत्कालीन प्राचार्य असलेले डॉ. अरविंद देशमुख अनेक समाजीक कार्यात सक्रिय असतात.मात्र काही वर्षांपूर्वी




त्यांना समजले की गावाच्या बाजूला असलेल्या काला गोटा गोटा या बेड्यावरील काही नागरिक गावापासून वेगळे राहत असल्याची माहिती अरविंद देशमुख यांना मिळाली.ते लोक चोऱ्या, मारामारी करतात अनेक जणांवर गुन्हे देखील दाखल आहेत त्यामुळे ते गावाच्या बाहेर वेगळे राहतात असे माहिती पडल्यावर अरविंद देशमुख यांनी काही वर्षांपूर्वी त्याठिकाणी जाण्याचा प्रयत्न केला होता मात्र सहकाऱ्यांनी सांगितलेली बाब अत्यंत खरी ठरली. मात्र त्यावेळी परत आलेले देशमुख यांनी जिद्द सोडली नाही दिवाळीचे औचित्य साधून त्यांच्यासाठी काला गोटा येथे जाऊन त्यांच्यासोबत दिवाळी साजरी केली आणि त्यांनतर तेथून खऱ्या अर्थाने पारधी समूहाच्या परिवर्तनाची सुरुवात झाली. येथील पारधी समूहात आता कमालीचा बदल झाला. मुले शिकायला लागली,वडिलांनी चोरी, मारामारी सोडली ते चांगल्या ठिकाणी कामाला लागले आहेत.संत गाडगेबाबा यांच्या दशसुत्रीला अनुसरुन सोमवारी त्याठिकाणी काला गोटा येथील पारधी बांधवांनी ग्रामस्वच्छता केली. समाजसेवक धीरुभाई सांगाणी यांच्या सहयोगाने व अरविंद देशमुख यांच्या प्रयत्नाने प्रत्येक कुटुंबाला दिवाळी फराळ वाटप करण्यात आला. गेल्या पंधरा वर्षात येथील समूहामध्ये कमालीचा बदल झाला त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांच्या माथ्यावरील बदनामीचा असलेला डाग मिटविण्यासाठी प्राचार्य अरविंद देशमुख यांची मोलाची भूमिका आहे. यावेळी फराळ वाटप कार्यक्रमात कला व विज्ञान महाविद्यालयाचे हर्षल दारोकार, निशा दमाये, विशाल गोहत्रे,रोहित पाटील, शशांक चौधरी, मयूर गौड व अभिजित बाखडे आदी विद्यार्थी देखील उपस्थित होते. यावेळी सर्व पारधी बांधवांनी प्राचार्य अरविंद देशमुख व विद्यार्थ्यांचे आभार व्यक्त केले.

# रेल्वेतून फटाके न्याल तर कायद्याच्या कचाट्यात अडकाल
# 'आरपीएफ'च्या पथकांकडून प्रवाशांची चौकशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती १२**

दिवाळीनिमित्त काही प्रवासी फटाके, तसेच अन्य ज्वलनशील पदार्थ रेल्वेतून नेण्याची शक्यता असते. प्रवाशांच्या व रेल्वेच्या सुरक्षेसंबंधाने रेल्वे सुरक्षा दलाने विशेष सतर्कता बाळगली आहे. चंद्रपूर, बल्लारपूरसह जिल्ह्यातील इतर रेल्वे स्थानकावर तपासणी केली जात आहे.



रेल्वेत प्रवास करताना शोभेचा दारुगोळा, फटाके किंवा कोणतेही ज्वलनशील पदार्थ जवळ बाळगू नका, अन्यथा दिवाळीच्या सणात तुम्हाला कारवाईचे फटाके लागण्याची अथवा कोठडीत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.रेल्वे कायद्यानुसार, रेल्वेतून प्रवास करताना कोणत्याही प्रकारचे ज्वलनशील पदार्थ अथवा स्फोटके, फटाके बाळगण्यास किंवा त्याची वाहतूक करण्यास सक्त मनाई आहे. असे असूनही अनेक जण लपूनछपून हे प्रतिबंधित पदार्थ, वस्तू सोबत नेतात. सध्या दिवाळीचा सण तोंडावर आहे. त्यामुळे गाड्या आणि रेल्वेस्थानकांवर गर्दी वाढली आहे. ती संधी साधूनअनेक जण फटाक्यासारखे स्फोटक साहित्य, वस्तू सोबत नेत असल्याचे उघड झाले आहे.

रेल्वेत आग लागली किंवा स्फोट झाला तर अनेक प्रवाशांच्या जिवाला, तसेच साहित्याला धोका होण्याची शक्यता असते. सुरक्षेसाठी रेल्वे प्रशासनाने सुरक्षा दलाची विशेष पथके विविध ठिकाणी तैनात केली आहेत.या पथकांकडून कुण्या प्रवाशाजवळ फटाके आहेत का, कुणी दुसरे कोणतेही ज्वलनशील पदार्थ अथवा स्फोटके सोबत नेत आहेत का, त्याची चौकशी करीत आहेत.

**प्रवाशांनीही बाळगावी सावधानता**

रेल्वे सुरक्षा दल प्रतिबंधित साहित्य सोबत नेताना कुणी आढळल्यास त्याच्यावर कडक कारवाई करीत आहेत. प्रवाशांनी त्याची दखल घेत कोणत्याही प्रकारचे फटाके, स्फोटक साहित्य अथवा गॅस सिलिंडर, स्टोव्ह, केरोसीन, पेट्रोल, डिझेलसारखे ज्वलनशील पदार्थ रेल्वेस्थानकांवर नेऊ नये अथवा प्रवास करताना सोबत बाळगू नये, तसेच धूम्रपान करू नये, कुणाकडे हे असे साहित्य आढळल्यास तातडीने माहिती द्यावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# संशयास्पद बँकीग व्यवहाराची माहिती तातडीने सादर करण्याबाबत खर्च निरीक्षकांचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ३० अमरावती**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याअनुषंगाने अमरावती जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात दिनांक २० नोव्हेंबर२०२४ रोजी निवडणूक होणार असून निवडणुका शांततापूर्ण, भयमुक्त व पारदर्शकरित्या पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहिता लागू केलेली आहे.निवडणुक काळातील संशयास्पद बँकीग व्यवहाराची माहिती खर्च निरीक्षक यांना उपलब्ध करुन देण्याबाबत अग्रणी बँक, सर्व शासकीय व खाजगी बँक तसेच सह निबंधक, सहकारी पतसंस्था, अमरावती यांची सभा खर्च निरीक्षक वेंकन्ना तेजावथ यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच आयोजित करण्यात आली. या सभेत उपस्थित सर्व बँक अधिकारी व सह निबंधक यांना निवडणुक आयोगाने निर्देशीत केल्याप्रमाणे सर्व संशयास्पद व्यवहारांची माहिती विनाविलंब सादर करण्याची सूचना देण्यात आल्या. नोडल अधिकारी विजय देशमुख, सहायक नोडल अधिकारी दिनेश मेतकर, अग्रणी बँकेचे व्यवस्थापक अतुल खानजोडे तसेच विविध बँकेचे प्रतिनिधी, सहकारी पतसंस्थांचे सह निबंधक आदी यावेळी उपस्थित होते.

# तपासणीदरम्यान पोलिसांच्या हाती मोठे घबाड; कारमध्ये सापडले २ कोटी रुपये!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० मुंबई**

नाशिक महामार्गावर कसारा घाटातील चिंतामण वाडी पोलीस चौकीजवळ स्थानिक पोलिसांच्या हाती मोठे घबाड लागले आहे. पोलिसांनी आज नाकाबंदीदरम्यान नाशिकहून मुंबईकडे जाणारी एम. एच. ११. बी. व्ही. ९७०८ या गाडीत २ कोटी रुपयांची रक्कम आढळून आली आहे.

मुंबई-नाशिक महामार्गावर शहापूर तालुक्यातील कसारा घाटाच्या पायथ्याशी असलेल्या चिंतामण पोलीस चौकीजवळ



स्थानिक पोलीस कर्मचाऱ्यांकडून वाहनांची तपासणी करण्यात येत होती. यावेळी एम. एच. ११. बी. व्ही. ९७०८ या गाडीत रोख रक्कम आढळून आली आहे. या गाडीत अंदाजे २ कोटी रुपयांच्या आसपास रक्कम पोलिसांनी जप्त केली असून वाहन ताब्यात घेऊन भरारी पथकांकडून पैसे मोजण्याचे काम सुरू आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी मिलिंद शिंदे, प्रभारी अधिकारी सुनील बच्छाव व निवडणूक भरारी पथक व टीमकडून पुढील तपास सुरु आहे.दरम्यान, काही दिवसांपूर्वी पुणे जिल्ह्यात तपासणीदरम्यान ५ कोटी रुपयांची रक्कम सापडली होती. त्यानंतर आता शहापूर तालुक्यात २ कोटी रुपयांची रक्कम आढळल्याने खळबळ उडाली असून ही रक्कम नक्की कोणाची आहे, याबाबत अधिक तपास केला जात आहे.

# बच्चू कडूंजवळ सहा लाख रोख; १० लाखांचे कर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० अचलपूर**

दिव्यांगांसह सर्वसामान्यांसाठी शासनावर सातत्याने प्रहार करणारे अचलपूरचे आमदार बच्चू कडू पाचव्यांचा रिंगणात आहे. त्यांनी सोमवारी प्रहार पक्षातर्फे उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी अर्जासोबत दाखल केलेल्या शपथपत्रात त्यांच्याजवळ सहा लाखांची कॅश असल्याचे नमूद केले आहे.



कडू यांची जंगम मालमत्ता ५०.३८, लाख, तर स्थावर मालमत्ता ५५.५५ लाख आहे. त्यांच्यावर १०.८७ लाखांचे कर्ज आहे. त्यांच्या पत्नीच्या नावे ५९.६९ लाखांची जंगम, तर २.४५ कोटींची स्थावर मालमत्ता असल्याचे शपथपत्रात नमूद आहे. सन २०१९ मध्ये बच्चू कडू यांच्याजवळ ३०.८१ लाखांची जंगम व १.१८ कोटींची स्थावर मालमत्ता व ९०.८१ लाखांचे कर्ज असल्याचे शपथपत्रात नमूद होते. कडू यांच्या मुंबईस्थित एसबीआय खात्यात २.३१ लाख, बेलोऱ्याच्या एडीसीसी खात्यात ९.५० लाख जमा आहेत. प्रहार फूड लिमिटेडमध्ये चार लाखांचे शेअर्स, दोन एलआयसी पॉलिसीज, ४५ ग्रॅम सोने व अर्धा किलो चांदी आहे. त्यांच्या मालकीचे १८ लाखांची चारचाकी आहे त्यांच्या पत्नी नयना कडू यांच्या विविध बँक खात्यात १४.०७ लाख जमा आहे.

**दोन दशकात विविध जिल्ह्यांत ४९ गुन्हे दाखल**

दोन दशकात राज्यातील अनेक जिल्ह्यांत आलेल्या विविध आंदोलनात बच्चू कडू यांच्याविरुद्ध तब्बल ४९ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. यामध्ये काही प्रकरणात निर्दोष, काही प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. बच्चू कडू यांची मौजा शिवंगा २ व मौजा शर्यतपूर शिवारात १० एकर जमीन आहे. याच शिवारात कडू यांच्या पत्नीच्या नावे २१ एकर शेती व काही प्लॉट आहे. शिवाय कडू यांच्याही नावे दोन प्लॉट आहेत. आयकर विवरणानुसार बच्चू कडू यांचे सन २०१९-२० मध्ये वार्षिक उत्पन्न २६,५५ लाख होते, तर सन २०२३-२४ मध्ये ६४.३० लाखांचे झालेले आहे. त्यांच्या पत्नीच्याही उत्पन्नात दुपटीने वाढ झालेली आहे.



# शेतकरी, शेतमजूर म्हणतात...कोण जिंकले कोण हरले? आमचे दिवस सारखेच

## मतदानासाठी कर्मचाऱ्यांना भरपगारी रजा, आम्हाला काय फायदा?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

जिल्ह्यात येत्या दि. २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी एकाच टप्प्यात मतदान असल्याने प्रत्येक मतदाराला निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावताना अडथळा येऊ नये. यासाठी मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी देण्यात आली. सरकारी कर्मचाऱ्यांना या दिवसाचा पूर्ण पगार मिळणार आहे. मात्र शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी अकुशल कामगार यांनी मतदानासाठी सुट्टी घेतल्यास पूर्ण दिवसाची मजुरी मिळणार नाही. निवडणुकीत कोण जिंकले, कोण हारले? आमचे सर्व दिवस सारखेच असल्याची शेतकरी तसेच इतर मजूरवर्गाची प्रतिक्रिया आहे.



देशाच्या लोकशाहीत मतदानाला फार महत्त्व आहे. १८ वर्षांवरील सर्व मतदारांनी मतदान करणे आवश्यक व असून, मतदानाचा दिवशी सरकारी म कर्मचारी यांना भरपगारी सुट्टी देण्यातआली. तसेच उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या प्रत्येक उपक्रम व आस्थापनेला पूर्ण दिवस सुटी देणे शक्य नसल्यास मतदानासाठी संबंधित जिल्हाधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्वपरवानगी दोन तासांची सवलत मिळणार असून, कर्मचाऱ्यांना मतदानासाठी मीडवीक ऑफ मिळणार आहे.कर्मचाऱ्यांचा पगार न कापता मतदानाचा हक्क बजावता येणार आहे.' मात्र देशाच्या पोशिंदा असलेले शेतकरी, शेतमजूर, रोजंदारीवर काम करणारे मजूर, अकुशल कामगार, कारागीर, कंत्राटी मानधनावर काम करणारेअसंघटित रोजंदार, हातावर पोट असलेले कष्टकरी यांना सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे कामावर न जाता मतदानासाठी एक दिवसाची पूर्ण रोजंदारीची मजुरी मिळेल काय? एक दिवस कामावर न गेल्यास संध्याकाळची चूल पेटणार की अशी गरीब जनतेची अवस्था आहे. त्यामुळे निवडणुकीच्या सार्वजनिक सुट्टीचा आम्हाला काय फायदा? असा कष्टकरी जनतेचा सवाल आहे. दरम्यान निवडणुकीनंतर कष्टकरी व गरजुंना त्यांच्या समस्यांवर विचार करणारे सरकार हवे आहे. वारंवार निवडणुकीत आम्ही मतदान करतो परंतु गंभीरपणे विचार केला जात नाही.

> निवडणूक झाल्यावर लोकप्रतिनिधी आणि कर्मचारी यांचा विचार होतो. मात्र सरकार निवडून देणाऱ्या सामान्य जनतेच्या आयुष्य म्हणजे मातीत जगणे अन् मातीतच मरण्यासारखे आहे.
>
> **– मिलिंद कासदेकर शेतमजूर**

> निवडणुकीपूर्वी ३०० ते ३५० रुपये रोजी मिळते आणि मतदान झाल्यावरही तेवढीच मिळेल. त्यामुळे कोण जिंकले, कोण हारले? – आमच्या कामात किंवा रोजीत कोणताच बदल होत नाही.
>
> **मंदा अकर्ते शेतमजूर**

# 'आनंदाचा शिधा' लांबणीवर दिवाळीच्या उत्सवावर विरजन

## लाभार्थ्यांचा हिरमोड : शिधापत्रिकाधारकांची दुकानदारांना विचारणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० मेळघाट**




स्वस्त धान्याचा लाभ मिळणाऱ्या लाभार्थ्यांना राज्य शासनाच्यावतीने १०० रुपयांत आनंदाचा शिधा दिला जातो. यावर्षी दिवाळीला मिळणारा आनंदाचा शिधा मात्र आचारसंहितेमुळे वितरित झाला नाही. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना शासकीय योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागत आहे.

उत्सव काळात स्वस्त धान्य लाभार्थ्यांना शासनाच्यावतीने १०० रुपयांत चार प्रकारचे शिधा दिले जातात. दिवाळी सणानिमित्त मागील वर्षी शिधा वाटप करण्यात आलेले होते; परंतु यावर्षी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता असल्याने आनंदाचा शिधा वितरणात अडचणी आहेत. विशेष म्हणजे, १ नोव्हेंबरपासून रास्त भाव दुकानदारांनी पुकारलेला बंद मागेघेण्यात आला असला, तरी लाभार्थ्यांना दिवाळीनंतरच धान्य मिळणार आहे. जिल्ह्यात शेकडो रास्तभाव दुकानाच्या माध्यमातून अंत्योदय, प्राधान्य गट योजनेचे हजारी लाभार्थी आहेत. या सर्वांना सरकारने सण-उत्सव काळात आनंदाचा शिधा ही योजना रास्त दुकानाच्या माध्यमातून देणे सुरू केले. प्रत्येक सणाला आनंदाचा शिधा मिळू लागला. या दिवाळीतहीआनंदाचा शिधा मिळण्याची शक्यता होती; परंतु मध्येच आचारसंहिता सुरु झाल्याने ऐन दिवाळीत आनंदाचा शिधा वितरणात आडकाठी येत असल्याचे दिसून येते.

# ओळख पटविण्यासाठी १२ पुरावे धरले जाणार आहेत ग्राह्य

## मतदानाच्या वेळी सादर करता येणार : निवडणूक आयोगाची आहे परवानगी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या मतदानावेळी मतदान केंद्रावर आपली ओळख पटवून देण्यासाठी मतदारांना देण्यात आलेल्या मतदार ओळखपत्राशिवाय इतर १२ प्रकारचे पुरावे ग्राह्य धरले जाणार असल्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत.

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करिता जिल्ह्यात २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. ज्या मतदारांना छायाचित्रासह मतदार ओळखपत्र देण्यात आलेले आहे ते मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्रसादर करु शकतात. मात्र जे



पटविण्यासाठी १२ पुरावे मतदान छायाचित्रासह मतदार ओळखपत्र केंद्रावर सादर करता येणार आहे, अशी (EPIC) सादर करु शकत नाहीत अशा माहिती निवडणूक आयोगाने दिली मतदारांना त्यांची ओळख आहे.

**हे पुरावे ग्राह्य धरले जाणार**

मतदार ओळखपत्राच्या व्यतिरिक्त आधार कार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक,पोस्ट ऑफिस यांनी जारी केलेल्या छायाचित्रासह पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहनचालक परवाना, पॅन कार्ड, रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया यांच्याद्वारा नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, फोटोसह पेन्शन दस्तऐवज, केंद्र-राज्य सरकार-सार्वजनिक उपक्रम-पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा: ओळखपत्र, आमदारांना दारांना देण्यात आलेले अधिकृत ओळखपत्र हे पुरावे सादर करता येऊ शकतील.

# आजोबा जिवंत आहेत की गावाला गेलेत? निवडणूक आयोगाची शोध मोहीम सुरू : घरातूनच मतदानाची सोय होणार उपलब्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

वयाची ८५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी घरून मतदान करावे, यासाठी अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांची शोध मोहीम सुरू आहे. यासाठीच्या प्रयत्नांना लोकसभा निवडणुकीत अत्यल्प यश मिळाल्याने आता इमारती-चाळीतील आओवा हुडकून काढण्याची मोहीम निवडणूक आयोगाने सुरू केली आहे. यामुळेच आता अंगणवाडी सेविकांना शोध मोहिमेदरम्यान 'आजोबा जिवंत आहेत की गावाला गेलेत?' असा प्रश्न विचारावा लागत आहे.

निवडणूक आयोगाने मतदारांना१९९९ मध्ये मतदार ओळखपत्रे दिली. त्यावेळी ज्यांचे वय ६० ते ६५ वर्षे होते, अशा व्यक्तींच्या नावाची यादी अंगणवाडी सेविकांना दिली आहे. त्यांनी वेगवेगळ्या विभागांत जाऊन ते मतदार त्याच पत्त्यावर वास्तव्यास असतील, तर त्यांचे घरून मतदानाचे अर्ज भरून घ्यायचे, असा द्राविडी प्राणायम आयोगाला करावा लागत आहे. ८५ व त्यापेक्षा अधिक वयाच्या व्यक्तींना मतदान केंद्रावर येण्याचे कष्ट घ्यावे लागू नयेत, यासाठी अगोदर अर्ज भरावा लागतो.

जिल्ह्यातील शहरांतील मंडळीनोकरी, व्यवसायात इतकी व्यस्त असतात की, असा अर्ज भरायला घरातील कुणीही तरुण व्यक्ती जात नाही. अशावेळी वयोमानानुसार आजोबांचे मत फुकट जाते. गमतीचा भाग म्हणजे आयोगाने अंगणवाडी सेविकांना दिलेल्या यादीत अनेक नावांपुढे अंदाजे वय ८९, १०, १६ असे लिहिले आहे. प्रत्यक्षात काही आजोबांचे १५ ते २० वर्षांपूर्वीच निधन झाले आहे.



### तरुणांचा नाव नोंदविण्याचा उत्साह

राजकीय पक्ष व वैयक्तिक पातळीवर सारेच तरुण मतदारांची नावे नोंदविण्याचा उत्साह दाखवतात. मात्र, घरातील व्यक्तीचे निधन झाल्यावर आयोगाला त्याबाबत सूचना देऊन मृत व्यक्तीचे नाव वगळण्याची तसदी कुणीही घेत नाही.

### जन्म-मृत्यू नोंदीचा तपशील आयोगाला द्यावा

गेल्या काही वर्षांत प्रत्येक व्यक्तीचे आधार व पॅनकार्ड बँक खात्याशी जोडण्याची मोहीम केंद्र सरकारने राबविली. याच धर्तीवर देशभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांकडील जन्म-मृत्यू नोंदणीचा डेटा जर निवडणूक आयोगाच्या मतदार याद्यांशी लिंक केला, तर कुठल्या मतदाराचा मृत्यू झाला याचर्ची आयोगाला माहिती मिळेल.

# प्रचारासाठी उमेदवारांची 'फराळ' डिप्लोमसी

## दिवाळीत मतदारांऐवजी कार्यकर्त्यांच्या घरी जाणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

निवडणुकीच्या रिंगणात उभ्या असेलल्या अनेक उमेदवारांनी दिवाळीचा वापर करण्याचे तंत्र अंगिकारले आहे. थेट सणाच्या दिवशी कार्यकर्त्याच्या मतदारांच्या दारात जाऊन रोष ओढवून घेण्याऐवजी दिवाळी सणाच्या नावाखाली चाळी, सोसायटींमधील कार्यक्रमाला हजेरी लावण्याकडे उमेदवारांचा कल असल्याचे एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याने सांगितले. त्यातच निवडणुकीसाठी अनेक उमेदवारांनी दिवाळी सणाच्या दिवशी कशा पद्धतीने प्रचार करायाचा यासाठी क्रिएटिव्ह टीमच्या खास बैठकाही आयोजित केल्या आहेत.



दिवाळीच्या काळात थेट मते मागण्याऐवजी नागरिकांवर विविध माध्यमांतून दिवाळीच्या शुभेच्छांचा 'वर्षाव' करण्यात येणार असल्याचे समजते. सोशल मीडियाद्वारे करण्यात येणाऱ्या प्रचाराने हैदोस घातला आहे. मोबाइलवर सर्वच उमेदवारांच्या नावे शुभेच्छा मिळत असल्याने नागरिक कमालीचे अस्वस्थ झाले आहेत. सोशल मीडियावरील अतिरेकी प्रचार होणार नाही, यासाठी काही उमेदवार ' आस्ते कदम' टाकताना सुद्धा पाहायला मिळत आहे.

**प्रत्यक्ष भेटीचे नियोजन ४ नोव्हेंबरला**

घरोघरी जाऊन प्रचार करणे हे सर्वच उमेदवाराचे लक्ष्य असून, ते नियोजन ४ नोव्हेंबरला करणार असल्याचे विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून सांगण्यात येत आहे.

निवडणूक आयोगाच्या वेळापत्रकानुसार ४ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यानंतर खऱ्या अर्थाने किती उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे राहणार असल्याचे स्पष्ट होईल. अनेक अपक्ष, बंडखोर उमेदवार या शेवटच्या दिवशी उमेदवारी मागे घेत असल्याचे चित्र यापूर्वीच्या निवडणुकीत दिसले आहे.

# पि. एम. मित्रा टेक्सटाईल पार्कला पर्यावरण मंत्रालयाची मंजुरी

## केंन्द्र सरकारकडून मा. खा. नवनित राणा यांना लेखी स्वरुपात पत्र प्राप्त दिवाळीपूर्वी केंन्द्रसरकारचा ऐतिहासीक निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

अमरावती एम. आय. डी. सी. मध्ये मा. खा. नवनित रवि राणा यांचे पाठपुराव्याने मा. प्रधानमंत्री यांनी पि.एम मित्रा टेक्सटाईल पार्क मंजूर केले त्याचे नुकतेच भूमिपूजन त्यांनी केले. हा पी.एम.मित्रा टेक्सटाइल प्रकल्प पूर्ण होण्यासाठी केंद्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालया कडून समितीची मान्यता अत्याश्यक असते हि मिळवण्यासाठी मा. खा. नवनित रवि राणा यांनी केंन्द्र सरकार कडे लेखी स्वरुपात पाठपुरावा केला होता त्यांना यश येऊन केंद्र सरकारने . दि ०९ सप्टेबर २०२४ रोजी पि. एम. मित्रा टेक्सटाईल पार्कला केंन्द्रसरकारने





पर्यावरण समितीची मान्यता दिली आहे.या संबधाने पर्यावरण व जलवायु परिवर्तन मंत्री भूपेन्द्र यादव यांनी मा. खा. नवनित रवि राणा यांना त्यांचे पत्र क्र ख- ३-२ दि. ०९ ऑक्टोबर २०२४ रोजी लेखी पत्राद्वारे कळविले आहे.

पि. एम. मित्रा टेक्सटाईल पार्कचे काम सुरु होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मा. खा. नवनित रवि राणा यांच्या पाठपुराव्यामुळे हजारो बेरोजगार तरुन तरुणींना त्या ठिकाणी रोजगार मिळणार आहे . अशाप्रकारे केंन्द्र सरकारने मा. खा. नवनित रवि राणा यांचे लेखी पत्रावरुन दिवाळीपुर्वी भेट देवून लेखी पत्राद्वारे कळवून ऐतिहासिक निर्णय केंन्द्र सरकारने घेतला असल्याचे कळविले आहे. संपुर्ण जिल्हयातून या खा.नवनीत रवी राणा यांचे वरील कामाप्रती संबधाने आनंद व्यक्त होत आहे.

# बडनेरा विधानसभा मतदार संघातील उमेदवाराच्या खर्च तपासणीचे वेळापत्रक जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३० अमरावती,**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने खर्च निरीक्षक यांच्याशी चर्चा करून प्रत्येक उमेदवाराची खर्च नोंदवही तपासणीसाठी वेळापत्रक तयार करण्यात येत आहे. बडनेरा विधानसभा मतदारसंघातील सर्व उमेदवारांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन ३७ -बडनेरा विधानसभा, मतदार संघाचे उपजिल्हाधिकारी महसूल तथा निवडणूक निर्णय अधिकारी विवेक जाधव यांनी केले आहे.पहिली तपासणी दि. ७ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी २.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत, दुसरी तपासणी दि. ११ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी २.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत, तिसरी तपासणी दि. १५ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी २.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहील. तपासणीचे ठिकाण निवडणूक खर्च तपासणी कक्ष,उपविभागीय अधिकारी कार्यालय, जुनी अमरावती तहसिल कार्यालय, अमरावती येथे राहील.

जर उपरोक्त दिनांकाला सर्व उमेदवारांच्या लेख्यांची तपासणी वेळेअभावी पूर्ण होऊ शकली नाही तर उर्वरित उमेदवारांच्या लेख्याची तपासणी त्याच ठिकाणी दुसऱ्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत पूर्ण करण्यात येईल.

बडनेरा विधासभा मतदारसंघ, विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मधील सर्व उमेदवारांनी आपले खर्चाचे लेखे आवश्यक त्या सर्व अभिलेख्यासह तपासणीसाठी स्वत: किंवा प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत उपलब्ध करून द्यावे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, तपासणी अनिवार्य असल्याने कोणत्याही उमेदवाराने किंवा प्राधिकृत प्रतिनिधीने अनुपस्थित राहू नये, अन्यथा नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.